जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १५ दिनांक - ०५/०१/२०२४**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वाहन चोरी करणा-या कात्रजच्या बंटी बबलीचा पर्दाफाश

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत चोरींच्या गुन्हयांचे प्रमाण वाढल्यामुळे वरीष्ठांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना चोरीच्या गुन्हयांतील अज्ञात आरोपीतांचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे वाहन चोरांचा शोध घेत असताना,पोलीस अंमलदार,महेश बारवकर, निलेश ढमढेरे यांना स्वामी नारायण मंदीर येथे एक इसम वाहन चोरीची गाडी घेवुन थांबला आहे अशी त्यांचे बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली.

त्या अनुशंगाने तपास पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्वामी नारायण मंदीर येथे जावुन तेथे सापळा रचुन इसम नामे **रोहन श्रीराम पाठक,वय २० वर्षे,रा.नवीन बिल्डींग,स्वामी नारायण मंदीराचे मागे,न-हेगाव,पुणे** हा त्याचे ताब्यातील स्प्लेंन्डर दुचाकी गाडी सह मिळुन आल्याने त्यागाडीबाबत तपास करता,त्याने सदरची गाडी त्याची मैत्रिण हिचे मदतीने चोरी केल्याचे सांगितले. सदरची गाडी ही **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७८९/२०२३,भादंवि कलम ३७९** अन्वये गुन्हा उघडकीस आला आहे.

अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने व त्याच्या मैत्रिणींने मिळुन कात्रज भागातील दुचाकी गाडया चोरी केल्याची कबुली दिली असुन त्याचेकडुन **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८४४/२०२३,भादंवि कलम ३७९** या गुन्हयातील चोरीस गेलेली दुचाकी ही जप्त केली आहे. त्याचेकडुन ९५,०००/- रुपयांचे ०२ दुचाकी वाहने जप्त करून,१.भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७८९/२०२३, भादंवि कलम ३७९ २.भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८४४/२०२३,भादंवि कलम ३७९ अन्वये गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री. प्रविण कुमार पाटील,मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील,मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री. गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ,पोलीस उप निरीक्षक,धिरज गुप्ता,पोलीस अंमलदार,महेश बारवकर, निलेश ढमढेरे, सचिन सरपाले,बापु भिंगारे, शैलेश साठे, चेतन गोरे, निलेश जमदाडे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अभिजीत जाधव, अवधुत जमदाडे, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, मितेश चोरमोले, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.